# जिल्हा परिषद रत्नागिरी
## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन
## बांधकाम विभाग चिपळूण

| दुरध्वनी क्रमांक - (०२३५२) २२२३६८ | e-mail : eezpchiplun@gmail.com |
|---|---|
| जा.क्र.रजिप/बांधकाम चिपळूण/ए-१/टेंडर/ १६९४ /२०२३ | दिनांक :- ११/०५/२०२३ |


प्रति,

**चे.नवनाथ म.स.सं.मर्या. मु.पो.मुरडे,**
**ता.खेड, जि.रत्नागिरी**

विषय :- **कामाचे कार्यारंभ आदेश.....**
**आंबवली प्राथमिक आरोग्य केंद्र दुरुस्ती व रंगरंगोटी करणे ता.खेड, जि.रत्नागिरी**

लेखाशिर्ष :- **जिल्हा वार्षिक योजना प्रा.आ.केंद्र/उपकेंद्र बांधकाम (३४५१ २६०१) सन २०२२-२३**

अंदाजपत्रकीय रक्कम :- **१५,००,०००/-**
निविदा रक्कम :- **९,२२,९४२/-**
निविदा मंजुर रक्कम :- **९,२२,९४२/-**

ई-निविदा सुचना क्रमांक २० सन २०२२-२३ (मजूर सहकारी संस्था मर्या.राखीव निविदा ) मध्ये प्रसिध्द केलेल्या उपरोक्त कामाची आपण मागणी केली होती. सदर कामाची निविदा, **शे.०.००% निविदा दराने म्हणजेच (९,२२,९४२/-) निविदा मंजूर** झालेली असल्याने तसेच रक्कम रुपये **१०००/-** च्या मुद्रांकावर सदर कामाचा करारनामा पूर्ण करुन दिल्याने काम सुरू करण्यास या द्वारे आदेश देण्यात येत आहेत. तरी उपअभियंता **खेड** यांचे कडून कामाची माहिती करुन घेऊन त्याप्रमाणे कामाला सुरवात करावी. कामाची मुदत पावसाळा वगळून **दि. १५ फेब्रुवारी २०२४ पर्यंत** असुन ती या आदेशाचे दिनांकापासून मोजण्यात येईल.

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र.जिपर २०००/प्र.क्र.८३७/३५, मंत्रालय, मुंबई दि.०८ मे २००२ चे परिपत्रकानुसार मक्तेदाराने सोपविलेले कामाचा व ते पूर्ण करण्यासाठी नियुक्त केलेल्या कामगारांचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे बंधनकारक आहे. सदर विमा प्रत्यक्ष काम सुरु करणेपुर्वी उतरविणे बंधनकारक राहील. **तसे न केल्यास दंडात्मक कारवाई करणेत येईल याची नोंद घ्यावी.** तसेच गौणखनिज फी शासनास वेळच्या वेळी जमा करणे आवश्यक आहे तसेच काम सुरु करण्यापूर्वी कामाचे ठिकाणी माहितीफलक लावण्यात यावा. कामाचे देयक अनुदान उपलब्धते नुसार देण्यांत येईल. **देयकातून शासकीय नियमानुसार वस्तू व सेवा कराची कपात करणेत येईल. तसेच गौणखनिज व वस्तू व सेवा कर व इतर देयके शासन नियमा नुसार मक्तेदाराला आदा करणेत येईल.** कामातील उणीवांच्या दुरुस्ती कालावधी (Defect Liability Period हा महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१५१/इमारती-२, मुंबई ४०० ०३२ दि.१४ जानेवारी २०१९ अन्वये दोन वर्षे निर्धारीत करणेत येईल.

**सदर कार्यारंभ आदेश हा जिल्हा परिषदेच्या http://www.zpratnagiri.org या सांकेतस्थळावर उपलब्ध करणेत आलेला असून त्याचा सांकेलांक क्र.२०२३०५१४९१२४९ हा आहे.**

कार्यकारी अभियंता
बांधकाम विभाग चिपळूण
जिल्हा परिषद रत्नागिरी

प्रत :- गटविकास अधिकारी, पंचायत समिती, **खेड, ता.खेड** यांना माहितीसाठी
प्रत :- उप अभियंता, जिल्हा परिषद उपविभाग **खेड, ता.खेड** यांना पुढील कार्यवाहीसाठी
२/- संबधीत एस.क्यु.म. यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी उप अभियंता **खेड, ता.खेड** यांचे मार्फत
**२/- सदर कामाची जागा जिल्हा परिषदेच्या मालकीची असलेबाबत खात्री करणेत यावी. मक्तेदार यांनी उपरोक्त परिपत्रकाप्रमाणे विमा उतरविल्याची खात्री केले नंतरच कामाची माहिती व आखणी करुन दयावी. कामाचे प्रगतीकडे लक्ष द्यावे वरील सुचनाचे तंतोतंत अनुपालनाकडे लक्ष द्यावे. प्रशासकीय मान्यतेमधील अटी व शर्तीचे पालन करावे. मंजूर अनुदापेक्षा जास्त खर्च करु नये**